## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ६९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/१०/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०६/१०/२०१७ चे १०.०० ते १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शशांक गजानन बडनाद वय २६ वर्ष रा. जुना इंडीयन गॅस गोडाऊन महेश नगर खोकरला याने आपली अॅक्टीव्हा ४ जी सिल्वर रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय २०४३ किंमती. ४३,०००/रु ची होन्डा शोरूम जवळ ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून थापड बुक्याने मारहान करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक ०४/१०/२०१७ चे ०८.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीचे घरी अतीक्रमण करून स्त्रीचा विनयभंग करण्याचे उद्‌देशाने तिचेवर हमला करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून घरातुन ओढुन अंगनात आणले व थापड बुक्यांनी मारहान करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याले फिर्यादीचे यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५१,३५४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रकच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक ०६/१०/२०१७ चे १७..०० वाजता दरम्यान यातील मोटार सायकल क्र. एमएच ३५ यु ९४४४ ने मोटार सायकल चालक संजय शालीक तरोने वय ३१ वर्ष रा. महालगाव हा फिर्यादी सोबत मोटार साकलने डब्बलसिट लाखांदुर रोडने जात असता लाखांदुर करून साकोली कडे येणाऱ्या आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक दिल्याने मोटार सायकल चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी घनश्याम हरी भेंडारारकर वय २२ वर्ष रा. महालगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**४) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/१०/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हे डॉक्टर शेडके यांचे दवाखाण्या जवळील सांदवाडीत(गल्लीत) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने अंधारात आपले अस्तित्व लपवितांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) तलावाचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०५/१०/२०१७ चे ११.०० वा ते ०६/१०/२०१७ चे १४.१५ वाजता दरम्यान यातील मृतक यपदास टिकाराम राऊत वय ५६ वर्ष, रा. गडेगाव हा शेतात पाणी वागवुन येतो म्हणुन शेतात गेला व तलावात पाणी किती आहे हे पाहण्यास गेला असता तलावाचे खड्डयात पाय घसरुन पाण्यात पडुन बुडुन मरण पावला त्याचे मरणास कोणताही संशय नाही असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०६/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आले आहे.

07.10.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता